INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-Research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

**October-2019 Special Issue – 201(B)**

## Nature Resources Based Sustainable Development
### With Special Reference to Tribal Community Rights







**Guest Editor :**
Dr. N. K. Phadke
Principal
Dr. S. D. Devsey Arts College & Commerce &
Science College, Wada,
Dist. Palghar (M.S) India

**Executive Editors -**
Dr. Dilip Telang
Dr. Surendra Khandekar
Dr. Rajendra Mane
Mr. Anup Pansare

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

**Impact Factor – 6.625** **ISSN – 2348-7143**

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-Research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

**October-2019 Special Issue – 201(B)**

## Nature Resources Based Sustainable Development
### With Special Reference to Tribal Community Rights

**Guest Editor :**
**Dr. N. K. Phadke**
Principal
Dr. S. D. Devsey Arts College & Commerce & Science College,
Wada, Dist. Palghar (M.S) India

**Executive Editors -**
**Dr. Dilip S. Telang**
**Dr. Surendra Khandekar**
**Dr. Rajendra S. Mane**
**Mr. Anup Pansare**

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar** (Yeola)

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 800/-

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | लेखक / लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | **मराठी विभाग** | | |
| 1 | पालघर जिल्ह्यातील आदिवासींच्या शाश्वत विकासातील आदिवासी सेवा मंडळाचे योगदान | डॉ.बळीराम चव्हाण | 5 |
| 2 | दळणवळणाच्या साधनात सागरी मार्गांचे महत्त्व | डॉ.एस.एल.म्हात्रे | 16 |
| 3 | वाढत्या शहरीकरणामुळे आदिवासी समाजावर होणाऱ्या दुष्परिणावर भाष्य करणारे नाटक : 'राणी माशी' | डॉ. संदिप बनसोडे व सुनील कांबळे | 19 |
| 4 | आदिवासी जमातीच्या हक्क आणि अधिकारासंदर्भात आंबेडकरी चळवळीची भूमिका | सुनिता सावरकर | 23 |
| 5 | आदिवासी समुदायाच्या शाश्वत विकासात कला, लोकसाहित्य, नृत्य, लोकगीते, पर्यटन, विज्ञान आणि तंत्रज्ञानाची भूमिका | प्रा. उद्धव घोमणे | 27 |
| 6 | आदिवासी समाज आणि शिक्षण | डॉ.व्ही.पी.फाळके | 34 |
| 7 | आदिवासी वर्गाच्या विकासाचे प्रयत्न | डॉ. वासुदेव डोंगरदिवे | 38 |
| 8 | तारपा वाद्याचे अस्तित्व : एक चिकित्सक अभ्यास | डॉ. विनोद सोनवणे | 43 |
| 9 | समाज माध्यमांचा पालघर जिल्ह्यातील आदिवासी जीवनावर पडलेला प्रभाव : एक भौगोलिक अभ्यास | श्री. विशाल सोनकांबळे व श्री. मुकेश कुलकर्णी | 48 |
| 10 | सहकारातून आदिवासी समुदायाचा शाश्वत विकास | सौ.योगिनी पाटील | 54 |
| 11 | आदिवासी जमातींच्या शाश्वत विकासात आदिवासी लोकसंस्कृतीची भूमिका | प्रा. कैलास कळकटे | 58 |
| 12 | आदिवासींच्या हक्कांच्या संदर्भात 'निसर्ग संसाधन आधारीत शाश्वत' आदिवासी धोरणे व त्यांची अंमलबजावणी | डॉ. रवींद्र घागस | 62 |
| 13 | महादेव कोळी जमातीच्या स्त्रियांची आर्थिक स्थिती – विशेष संदर्भ –देगलूर तालुका | स्वप्ना संगमवार | 68 |
| 14 | पर्यटक निघाले आदिवासींच्या भेटी करिता | डॉ. सौ. हेमलता मुकणे | 73 |
| 15 | कृषी पर्यटनातून आदिवासी लोकांचा चिरस्थायी विकास विशेष संदर्भ : पालघर जिल्हा | डॉ. जयवंत पाटील | 79 |
| 16 | आदिवासींच्या विकासात शासकीय योजनांचे योगदान | डॉ. ज्योती पोटे | 83 |
| 17 | महाराष्ट्रातील आदिवासींचे वैविध्यपूर्ण नृत्य प्रकार | डॉ. ज्योती रामोड | 92 |
| 18 | सेंद्रीय शेती काळाची गरज | श्री. कांतीलाल पाटील व डॉ. अनिल पाटील | 96 |
| 19 | आदिवासी स्त्री सक्षमीकरण : सामाजिक स्थिती | कविता लोखंडे व डॉ. विनायक शिंदे | 101 |
| 20 | आदिवासींच्या शाश्वत विकासासाठी कला, लोकसाहित्य, पर्यटन, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची भूमिका व सरकारचे धोरण | प्रा. किशोर चौरे | 105 |
| 21 | आदिवासी रामायण : एक लोककथा | डॉ. अंजली मस्करेन्हस | 110 |
| 22 | नैसर्गिक शेतीतून आदिवासी समाजाच्या शाश्वत विकासाचा अभ्यास (संदर्भ : पालघर जिल्हा) | अंकिता वर्तक | 115 |
| 23 | आदिवासी वारली चित्रकलेचे महत्त्व | प्रा.बाळासाहेब चकोर | 121 |
| 24 | आदिवासींचे जीवन व विवाहसंस्था | डॉ.संजय वैद्य | 124 |
| 25 | आदिवासी (कोळी) बोली भाषेतील शब्द | डॉ.एस.एस.भैरगुंडे | 127 |
| 26 | आदिवासी कलांची वैश्विकता | डॉ.भीमराव वानोळे | 133 |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 201(B) : Nature Resources Based Sustainable Development With Special Reference to Tribal Community Rights
ISSN : 2348-7143
October-2019

# वाढत्या शहरीकरणामुळे आदिवासी समाजावर होणाऱ्या दुष्परिणावर भाष्य करणारे नाटक : राणीमाशी

**मार्गदर्शक**
**डॉ. संदिप बनसोडे,**
मराठी विभागप्रमुख,
र.भ. अट्टल कॉलेज, गेवराई,जि. बीड.

**संशोधक**
**सुनिल सदाशिवराव कांबळे**
नाट्यशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

शहरी संस्कृतीपासून म्हणजेच नागर संस्कृतीपासून वेगळ्या आणि अलिप्त राहिलेल्या तसेच प्राकृतिक प्रदेशात वास्तव्य करणारे मूळचे रहिवासी म्हणून आदिवासी समाज मानला जातो. साधारणतः जंगलात तसेच दुर्गम दऱ्याखोऱ्यांत आणि सुसंस्कृत समाजापासून तुटत असलेल्या प्रदेशात आदिवासी हे वस्ती करुन राहतात. नागर समाजाशी जास्त संबंध नसल्याने आदिवासींची वैशिष्ट्यपूर्ण चालीरीती किंवा संस्कृती या आढळून येतात. परंतु अनेक लोकांचा आदिवासींबद्दलचा गैरसमज असल्याचे जाणवते. सर्वसाधारण समाजात आदिवासींबाबत भीतीयुक्त औत्सुक्य आहे. प्राथमिक अर्थव्यवस्था असणारे स्त्रियांचा जबरदस्तीने अपहरण करुन त्यांच्याशी पाशवी वर्तन करणारे, स्वच्छंदी लैंगिक संबंध ठेवणारे, वाट्टेल ते भक्षण करणारे याउलट नरभक्षकही आदिवासींना मानले जाते. तसेच जादूटोणा व वर श्रद्धा ठेवणारे, उघडेनागडे लोक म्हणजे आदिवासी असा गैरसमज शहरी समाजातील काही घटकांमध्ये आहे. याउलट निसर्गावर अवलंबून असणारे, स्वतंत्र वृत्ती असलेले तसेच आधुनिक जगाच्या संपर्कात न आल्याने आदिवासींची जीवन सुखमय व अनुकरणीय आहे असे अनेक साहित्यिकांनी आणि संशोधकांनी आपापल्या साहित्यात मांडले आहे. अनेक ग्रंथांमध्ये देखील आदिवासी जमातींचा आणि त्यांच्या जीवनशैलीचा उल्लेख केला गेलेला आहे.[१]

भारतीय स्मृतिग्रंथात देखील आदिवासी जमातींविषयीची माहिती अभ्यासकांना आढळून आली आहे. त्यात आदिवासी हे अनुलोम प्रतिलोम संकरातून निर्माण झाले. परंतु त्यातील शबर रक्श निषाद, किरात यासारखे गट या जाती नसून ते आदिवासी होते. त्यामुळे त्यांना समाजात हिन मानले जाऊ लागले. रामायणामध्ये देखील किरात, शबर या आदिवासींचा उल्लेख आहे. बेटावर गाणारे, कच्चे मांस खाणारे, खाली मानवाचे आणि वर वाघाचे शरीर असलेले किरांताचे वर्णन केलेले आढळून येते. निषाध हे जंगलात राहणारे लोक असा उल्लेखही केला गेलेला आहे. महाभारतात देखील पुलिंद व किरात हे हिमालयात राहणारे आदिवासी म्हणून उल्लेख केला आहे. एकलव्याची कथा ही देखील एका आदिवासीच्या अस्तित्त्वाचा पुरातन काळापासूनचा पुरावा आहे. तसेच कलचुरी राजविरुद्ध धिरू नावाच्या जमातीने बंड केल्याचा उल्लेखही चेदी राजाच्या शिलालेखात इतिहासकारांना आढळून आला आहे.[२]

एकंदरीत भारताच्या इतिहासात जर पाहिले तर आदिवासींचा उल्लेख हा पुरातन काळापासून आढळून येतो. मग ते आदिवासी जमाती आणि स्थानिक राजा यांच्यातील लढाई असो किंवा इंग्रजांविरुद्धच्या उठावामध्ये भारतभरातील आदिवासी समाजाने सहभाग घेतल्याचेही दिसून येते. जस-जशी मानव उत्क्रांती होत गेले तस-तसे काही आदिवासी समाजामध्ये काही बदल घडून ते मुख्य समाजाच्या प्रवाहात येताना दिसून आले. परंतु आजही काही आदिवासी समाज आज शहरापासून अलिप्त आणि वेगळा राहत आहे. त्यांच्यापर्यंत अद्यापही कोणत्याच प्रकारची सुविधा अजून पोहचलेली नाही. परंतु अशा आदिवासी जातींना किंवा व्यक्तिसमूहांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रादेशिक आणि

केंद्रीय सरकारी यंत्रणा ही विविध प्रकारच्या योजना आणि सवलती या आदिवासींसाठी व त्यांच्या पुर्नविकासासाठी अंमलबजावणी करताना दिसून येतात.[३]

पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी आदिवासींच्या विकासाची पाच सूत्रे सांगितली आहेत. ती पुढीलप्रमाणे -

१. आदिवासी लोकांनी आपली बुद्धी व कुवत यानुसार विकास करुन घ्यावा. इतरांनी त्यांच्यावर यासाठी दडपण आणू नये. त्यांच्या पारंपारिक संस्कृतीना व कलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे.
२. आदिवासींचे जमीनविषयक आणि वनविषयक हक्क मान्य केले पाहिजे.
३. प्रशासन व विकास कार्य करण्यासाठी त्यांच्यातील लोकांना शिक्षण देऊन कार्यतत्त्पर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी बाहेरच्या काही तंत्रज्ञांची आवश्यकता भासेल पण तरीही आदिवासी क्षेत्रात बाहेरच्या लोकांच्या जास्त शिरकाव टाळला पाहिजे.
४. आदिवासी क्षेत्रावर वाजवीपेक्षा आणि गुंतागुंतीची प्रशासन व नियम लादू नये. त्यांच्यातीलच सांस्कृतिक आणि सामाजिक संस्थांमार्फत विकास कार्य करावे.
५. आदिवासींच्या विकासासाठी किती पैसा खर्च झाला यावरुन त्यांची प्रगतीचा निष्कर्ष न काढता त्यांच्या स्वभावगुणांविषयीच्या विकासाआधारे तो निष्कर्ष ठरवावा.[४]

या सुत्रांनुसार आदिवासीच्या जीवनात जास्त ढवळाढवळ न करता त्यांना सुखी जीवन जगण्यासाठी विकास योजना राबवण्यात याव्यात. भारतीय समाजाचा घटक असलेला आदिवासी समाज हा अविकसित, मागास, दुर्बल व कमकुवत असल्याचे दिसून येते. हा समाज सामाजिक, आर्थिक, शैक्षणिकदृष्ट्या मागास असल्यामुळे त्याच्या प्रगतीसाठी सरकारतर्फे विविध योजना या राबवल्या जात आहेत. आदिवासी समाजाला मूळ प्रवाहात आणण्यासाठी व त्यांचे जीवनमान सुधरवण्यासाठी शिक्षण, निवास, अन्न, पाणी, रस्ते, वीज इत्यादी मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी अनेक योजना आता सुरु करण्यात आलेल्या आहेत. त्यासाठी प्रशासकीय यंत्रणा आवश्यक असल्यामुळे १९८३ साली मंत्रालयीन स्तरावर आदिवासी विकास विभागाची स्थापना करण्यात आली. त्यातून आदिवासी समाजाच्या विकासाच्या योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. परंतु नैसर्गिक वातावरणात जीवन जगणाऱ्या आणि स्वच्छंदी आदिवासी समाजाला या सवलती आणि उपाययोजनांची माहिती बऱ्याचदा होत नाही किंवा सरकारी यंत्रणा तेवढी सक्षमरित्या योजनांची अंमलबजावणी करण्यात अयशस्वी होताना दिसून येत आहे. आज भारतीय लोकसंख्येमुळे शहरातील मर्यादित जागेत राहण्याचा प्रश्न उपस्थित झाल्याचे दिसून येते. त्यामुळेच आता लोकवस्ती निर्माण करण्यासाठी जंगलाची बेसुमार कत्तल होताना आपणास दिसून येते. त्याच बरोबर नैसर्गिक संपत्ती आणि जंगलाच्या भागाचा वापर काही शहरी लोक आपल्या फायद्यासाठी आणि आर्थिक भरभराटीसाठी करताना दिसते. त्यासाठी ते आदिवासीच्या क्षेत्रावर कब्जा करुन त्यांना बेघर करण्यात येत आहे. वाढते शहरीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे जंगलक्षेत्र कमी होत आहे. त्याचा परिणाम असा होतो की, आदिवासींचे जनजीवन संपूर्णपणे विस्कटले जाऊ लागले आहे. त्यामुळे आदिवासी, सरकार आणि भांडवलदार यांच्यात संघर्ष होताना दिसून येतो. यामुळे आदिवासींचे पुर्नविकासासाठी सरकार आता योजनांची अंमलबजावणी काटेकोरपणाने व्हावी यासाठी प्रयत्न करताना दिसत आहे.[५]

सदरील 'राणी माशी' ही शिवशैलेश कोरडे लिखित नाटकामध्ये आदिवासी समाजावर शहरीकरणाचा कसा परिणाम होत आहे याचे नाट्यमय चित्रण त्यांनी या नाटकात मांडले आहे. वाढत चाललेल्या शहरीकरणामुळे आदिवासींवर आणि त्यांच्या जीवनावर शहरीकरणाचा कसा विपरित परिणाम होत आहे आणि आदिवासींच्या क्षेत्रावर शहरी अतिक्रमण कसे होत आहे त्यामुळे सरकार आणि आदिवासी यांच्यात संघर्ष जो उभा झाला आहे याचे नाटकीय घटनाक्रम 'राणी माशी' या नाटकात नाटककाराने दर्शविले आहे.[६]

या नाटकाचा अभ्यास करताना असे निदर्शनास आले की, नाटकामध्ये सरकारकडून आदिवासींचे जीवनमान सुधरावे, नव्या युगातील तंत्रज्ञानांचा आणि पद्धतीचा लाभ आदिवासींना मिळावा आणि सामाजिक स्तर आदिवासींचे सुधरावे तसेच सरकार आणि आदिवासी यांच्यातील संघर्ष संपुष्टात आणण्यासाठी एक उपाय काढण्यात आला. या नुसार आदिवासी मुलांपैकी इच्छु मुलांना शहरात शिक्षणासाठी आणण्यात आले. त्यासाठी आदिवासींनी सहमती दर्शवून बोरगा मधाडी या मुलास शिक्षणासाठी शहरात आणले. पुढे १५ वर्षात त्याचे शिक्षण पूर्ण झाल्यावर त्याला परत त्याच्या घरी म्हणजेच जंगलात पाठविण्याचे ठरविले. त्यासाठी प्रशासनाने मोठ्या थाटामाटामध्ये त्याचा निरोप समारंभ आयोजित केला. या कार्यक्रमाला मुख्यमंत्रीदेखील उपस्थित होते. आता या मुलामुळे मधाडी ही त्याची आदिवासी जमात जी वंचित आयुष्य जीवन होती त्यांच्या पुनर्वसनाला आता सुरुवात होईल असे सगळ्यांना वाटत होते. कार्यक्रम झाल्यावर त्या आदिवासी मुलाला म्हणजेच जोतिबाला जंगलात त्याच्या घरी सोडण्यासाठी इश्वत नावाचा सहकारी माणूस त्याच्या सोबत जंगलात पाठवण्यात येतो. नाटकात लेखकाने या वेळी ईश्वत आाि जोतिबा यांचे जंगलातील प्रवासवर्णन दर्शविताना प्रेक्षकांना त्या जंगलाची जाणीव व्हावी असा नाट्यप्रसंग रंगमंचावर सादर केला. आपण जंगलात राहणाऱ्या आदिवासी आणि शहरी समाज यांचे जीवन कसे आहे हे संवादाद्वारे प्रेक्षकांना नाटककाराने याची जाणीव करुन दिली. शहरीकरणामुळे मनुष्याचे जीवन किती धकाधकीचे आणि स्पर्धात्मक झाले आहे हे ससया नाट्यप्रसंगात ईश्वत या शहरी माणसाद्वारे नाटककाराने दर्शविले. आज माणसाकडे नवनवीन तंत्रज्ञान आहे. त्याच्या जोरावर त्याला अशक्य काहीच वाटत नाही. परंतु यामध्ये माणूस आपला स्वार्थ साधण्यासाठी कोणत्याही स्तराला जाऊ शकतो. याची जाणीव ईश्वत या शहरी माणसाला होती. आदिवासी जीवन खरंच खूप चांगले आहे. आदिवासी प्रेमळ स्वभावाचे असतात. आपण जसे आदिवासींना समजतो तसे ते नाहीत. ते जोतिबा ईश्वतला पटवून देतो. पुढे जोतिबा ईश्वत आदिवासी बस्तीवर जातात तेव्हा आदिवासींचा शहरी लोकांवर रोष आहे हे ईश्वतला दिसून येते. कारण शहरी लोकांनी आदिवासींना जंगलातून फिटावून लावण्यासाठी आदिवासींवर हल्ला केला. त्यात अनेक आदिवासींना आपला जीवन गमवावा लागला. यामध्ये नाटककाराने असे दाखविले की, मुळात आक्रमक दिसणारा आदिवासी समाज मुळात शहरीकरणामुळे घाबरलेला व बिथरलेला जाणवतो. त्यामुळे आदिवासींची एकच धारणा दिसून येते, आपल्याला जगायचे तर समोरच्या व्यक्तीला मारा. ते पण वेळ आली तरच. यातून नाटककार असे मांडतो की, आदिवासी लोकांना शहरीकरणामुळे जीवन घेण्यात त्रास होत आहे. नाटकात पुढे जेव्हा जोतिबा आपल्या लोकांना समजून सांगतो की, ईश्वत चांगला माणूस आहे. तो आपल्याला मदत करायला आला आहे. मग हळूहळू आदिवासींच्या पण लक्षात येते की, शहरातील सगळीच माणसं ही वाईट नाही आहे. परंतु तरीही आदिवासी समाजातील भनरु आणि त्याच्या सहकार्यांना ईश्वतवर अजून देखील विश्वास नसतो. कारण त्यांना वाटत असते की, शहरी लोक हे फक्त लोभासाठीच आणि आपला स्वार्थ साध्य करण्यासाठीच लोकांशी सलगी करत असतात. पुढे नाटकात आदिवासी परंपरा व चालीरिती कशा आहेत ह्या विविध प्रसंगामधून नाटककार दर्शवितो. त्यासाठी नाटककार आदिवासींचा उत्सव आदिवासींचे देव, आदिवासी नृत्य व आदिवासी पाड्यावरचा देवऋषी ओझा आदि आदिवासी जीवन पद्धतीची मांडणी प्रसंगानुसार प्रेक्षकांसमोर प्रस्तुत करत असतो. तसेच जोतिबा आपल्या आदिवासी मित्रांना शहरी पद्धती, इथले जीवनमान कसे आहे, याची माहिती देत असतो. त्याचे वर्णन लेखकाने संवादरुपाने जोतिबा या पात्राद्वारे प्रेक्षकांसमोर प्रस्तुत केले आहे. आदिवासींना शहरी समाजाबद्दल सांगताना जेतिबा महापुरुषांबद्दलही आदिवासींना सांगतो. त्यावेळी आदिवासी लोकांना ते कुतुहलाचे वाटते. महापुरुष हा समाज सुधारक असतो, तो समाजात विकास घडवत असतो, समाजातील अनिष्ट रुढींविरुद्ध तो बंड पुकारत असतो आणि समाज प्रबोधन तो करत असतो. महापुरुष समाजासाठी किती महत्त्वाचा आहे या सगळ्याची जाणीव आदिवासींना जोतिबा करुन देतो. या सर्व गोष्टीमुळे आदिवासी लोकांना पण आपल्या आदिवासींचाही कोणी महापुरुष असावा असे वाटू लागते आणि मग जोतिबा आणि त्याचे आदिवासी मित्र आदिवासींमधला महापुरुष शोधण्याचे ठरवतात. यासाठी

लेखकाने शहरी समाजामध्ये महापुरुषाची प्रतिमा शहरी लोकांमध्ये कशी आहे याचे विडंबनात्मक चित्रण विविध प्रसंगाद्वारे प्रेक्षकांना करुन दिले. मुळात लोकांसाठी जो सर्वस्व पणाला लावून लोक उन्नतीचे कार्य करत असतो तो महापुरुष होय. परंतु आज या महापुरुषांना आपापल्या जातीपातीमध्ये वाटून घतले आहे व महापुरुषांची मूळ उद्दिष्टे शहरी माणूस कसा विसरुन गेला आहे याचे चित्रण नाट्यप्रसंगाद्वारे नाटककाराने प्रेक्षकांना दर्शविले आहे. जेव्हा जोतिबा महापुरुषांची माहिती देणारे पुस्तक आपल्या आदिवासी मित्रांना दाखवतो तेव्हा कोणता महापुरुष कोणत्या जातीचा आहे हे देखील तो आपल्या मित्रांना सांगत असतो. मूळामध्ये शहरामध्ये जोतिबाने हे शिक्षण घेताना अपल्या अवतीभवती घडणाऱ्या घटनांमधून व महापुरुषांच्या सण - उत्सवांवरुन त्याला याची प्रतिची आली की, महापुरुषांची जयंती किंवा पुण्यतिथी त्याच समाजाचे लोक साजरी करतात ज्या समाजाचा महापुरुष हा असतो. यातून जातीय व्यवस्था ही फक्त प्रगत शहरी लोकांमध्येच आढळून येते हे नाटककाराने दर्शविले आहे. त्यानंतर मग जोतिबा व त्याचे आदिवासी मित्र हे त्यांच्या आदिवासींचा महापुरुष शोधू लागतात. परंतु त्यामुळे त्यांना देखील सत्ता संघर्ष आणि लालसा ही शहराप्रमाणे आदिवासींमध्येही पसरेल हे जाणवू लागते. म्हणूनच सर्व आदिवासी अणि जोतिबा असे ठरवतात की, जोतिबाला शिक्षण देणारे त्याचे मास्तरच आदिवासींचा महापुरुष कोण होईल हे ठरवतील. त्यासाठी जोतिबा हा शहरातील त्यांच्या मास्तरांना आपल्या वस्तीवर बोलवतो. परंतु हा प्रकार समजल्यावर मास्तरांना जोतिबाचा खूप राग येतो आणि ते त्याला खडसावतात. तसेच त्याला आणि आदिवासीना सांगतात की, महापुरुष हे कोणत्या जातीच्या चौकटीत राहून समाजकार्य करत नव्हते. ते समाज प्रबोधनासाठीच आपले जीवन सर्मपीत करत होते. हे जातीपातीच्या संघषाने आज महापुरूषाचे विचार आणि उद्दिष्ट्ये कसे बाजूला पडत आहेत आणि मनुष्य कसा स्वार्थी झाला आहे याची जाणीव मास्तर हे पात्र सगळ्यांना करून देतो. तसेच शहरीकरणाच्या प्रभावाने आदिवासी जीवनात कशा अडचणी निर्माण झाल्या याचे चित्रण नाटकाराने नाटकात दर्शविले आहे.[७]

थोडक्यात आदिवासी समाज हा स्वच्छंदी आणि स्वावलंबी व निसर्गाशी एकरूप झालेला आहे. परंतु शहरातील वाढती लोकसंख्या व जागेची कमतरता आणि शहरी समाजाच्या काही लालची लोकांमुळे आदिवासी समाजाच्या जीवनावर घातक परिणाम होतांना दिसून येते. जंगलाची कत्तल आणि जमिन हस्तांतरामुळे आदिवासी जनजीवन कसे धोक्यात आले आहे याची जाणीव नाटककाराने प्रेक्षकांना करून दिली आहे.

**संदर्भ सूची :-**

१. http://mr.vikaspedia.in/social.-welfare आदिवासी विषयक माहिती विकासपिडीया
२. http://hi.m.wikipedia.org आदिवासी विकिपिडीया
३. महाराष्ट्र शासन, आदिवासी उपयोजना अहवाल, २०१५-१६
४. कुलकर्णी शौनक, महाराष्ट्रातील आदिवासी, डायमंड प्रकाशन पुणे, २०१०
५. देवगावकर स.जी. आदिवासी विकास प्रशासन, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०११
६. कसाळीकर माधव आणि कांबळे जयंत, आदिवासी भागत, १९८८
७. कोरडे शिवशैलेश राणी माशी, औरंगाबाद, २०१४